जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2020
पुढारी

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे १० टक्के शुल्क माफ

## पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमार्फत स्वावलंबी तत्त्वावर सुरू असलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता १० टक्के शैक्षणिक शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विद्यापीठ परिसर व परिक्षेत्रातील महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभाग, कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पाल्यांना ही योजना लागू असणार आहे. ज्या विद्यार्थ्याने विद्यापीठातील स्वावलंबी अभ्यासक्रमास प्रवेश घेताना इतर कोणत्याही शासकीय योजनांचा फी मधील सवलतीसाठी लाभ घेतला असल्यास त्यास योजनेचा लाभ घेता येणार नाही. अभ्यासक्रमाच्या वार्षिक शैक्षणिक शुल्कापैकी १० टक्के शैक्षणिक शुल्क माफ करण्यात येणार आहे. फी माफीचा लाभ मिळणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांस नियमाप्रमाणे इतर फी लागू राहणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

ही योजना लागू करताना एका स्वावलंबी तत्त्वावर सुरू असलेल्या अभ्यासक्रमात लाभार्थी संख्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या १० टक्केपेक्षा जास्त असल्यास गुणवत्ता यादी तयार करून १० टक्के विद्यार्थ्यांना लाभ देण्यात यावा, अशा सूचना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी संलग्नित महाविद्यालये, पदवी, पदव्युत्तर अधिविभागांना काढलेल्या परिपत्रकात देण्यात आल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2020
पुढारी

# विद्यापीठात इंदिरा गांधी यांची जयंती

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी हिंदी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी सर्वांना सद्भावना व एकात्मतेची शपथ दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय येवा योजना समन्यवक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2020
पुण्यनगरी

# विद्यापीठ परिसरात मॉर्निंग वॉकला गर्दी

**उचगाव : प्रतिनिधी**

कोल्हापूर शहराच्या पूर्व बाजूस असणाऱ्या शिवाजी विद्यापीठ, कृषी महाविद्यालय व राजाराम तलाव या निसर्गसंपन्न परिसरामध्ये सकाळी फिरायला येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे पहाटे पाच वाजल्यापासूनच हा परिसर गजबजून जात आहे. सध्या हिवाळा चालू झाल्याने सकाळी फिरायला जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, पुरुष, खेळाडू, सायकलपटू यांची गर्दी असते. गेले सहा ते सात महिने लॉकडाऊन असल्यामुळे अनेकांना फिरण्यावर मर्यादा येत होत्या; परंतु सध्या लॉकडाऊन शिथिल असल्यामुळे तसेच कोरोनाचा कहर कमी झाल्यामुळे नेहमीप्रमाणे सकाळी फिरायला जाणाऱ्यांची संख्या वाढत आहे. कृषी महाविद्यालयाचा उंच, सखल भाग व मोकळे मैदान, राजाराम तलाव परिसरातील विहंगम दृश्य, मिलिटरी परिसरातील दाट झाडी तसेच शिवाजी विद्यापीठ परिसरातील विस्तीर्ण परिसर, चांगले रस्ते, विविध प्रकारची वृक्षसंपदा, प्रदूषणविरहित हिरवागार परिसर, कमी वाहतूक त्यामुळे मॉर्निंग वॉकसाठी हा परिसर सर्वांच्या आवडीचा ठरत आहे.